IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# जागतिक राजकारणातील भारताचे स्थान

**डॉ.दीपक सर्जेराव पाटील-शेटके**
(राज्यशास्त्र), कोल्हापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
सॉफ्ट पॉवर
नैतिक प्रभाव
विचारधारा

**ABSTRACT**

जागतिक राजकारण हे अखंडपणे चालणारे असते. यामध्ये चढ-उतार, बदल व अनपेक्षित घटना-प्रसंग समाविष्ट असतात. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारण हे अधिक प्रकाशझोतात येऊ लागले. एकध्रुवीय, द्विध्रुवीय व बहुध्रुवीय अशी जागतिक राजकारणाची स्थित्यंतरे आपल्याला दिसतात. सामान्यत: विश्व स्तरावर जे राजकारण होत असते, त्यामध्ये जे राष्ट्र अधिक सामर्थ्यशाली असेल त्याचे उपद्रवमूल्यही अधिक असते. गरीब, अविकसित, विकसनशील व विकसित अशी सर्व राष्ट्रे सहभागातून हे जागतिक राजकारण आकारास येत असते, घडत असते. यामध्ये नेतृत्व, विचारधारा, संस्था-संघटना, राजनय, तिसरे पक्ष, दबाव गट-समूह, प्रभावशाली व्यक्ती ही आपली भूमिका पार पाडत असतात, स्थान निर्माण करत असतात. राष्ट्र-राज्य, संविधान, सार्वभौमत्व, राष्ट्रीय एकता, समान हितसंबंध, संघराज्य या संकल्पना 18 व्या शतकानंतर रूजू लागल्या, वसाहतवाद-साम्राज्यवादाचा शेवट होऊ लागला.

प्रस्तुत शोधनिबंध स्वातंत्र्योत्तर (आधुनिक) भारताचे स्थान, महत्त्व, प्रभव स्पष्ट करणारा आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Patil-Shetke, D. S. (2025). जागतिक राजकारणातील भारताचे स्थान. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), 325–329.

**प्रस्तावना:**

भारताचे विश्व स्तरावरील राजनीतीमध्ये असणारे स्थान हे 'आशियाचा भक्कम आवाज' अशा स्वरूपाचे आहे. भारत विकसनशील, गरीब व तिसऱ्या जगातील मानल्या जाणाऱ्या देशांचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता दर्शवतो आहे व त्यासाठी भारत सक्षम आहे. भारतामध्ये खूप साऱ्या अशा कल्याणकारी क्षमता आहेत, ज्यामुळे भारत जागतिक स्तरावर अखिल मानव जातीच्या कल्याणाच्या धोरणांना बळ देऊ शकतो.

आकारमान व लोकसंख्या तसेच प्रौढ मताधिकारामुळे भारत ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. भारताचे संविधान हे लिखित, विस्तृत व आदर्शवत असे आहे. भारताचे संविधान हे भारतासह जागतिक सुव्यवस्था-शांततेचा पुरस्कार करणारे आहे. सर्व जाती-धर्मांचे, वंशाचे समाज समूह भारतात सलोख्याने राहत आहेत. या विशाल भूमीत धर्मनिरपेक्षता, मानवता, सहिष्णूता, सौहार्द नांदत आहे. ही भारताची खूप मोठी शक्ती आहे. नवस्वतंत्र देश निर्माण झाले. 20 वे शतक हे खऱ्या अर्थाने जागतिक राजकारणाला कलाटणी देणारे ठरले. UNO व इतर महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाल्या. जागतिक राजकारण हे समान हित, उद्योग-व्यापार, वर्चस्वाची क्षेत्रे, परस्पर देवाण-घेवाण, सीमारेषा, आयात-निर्यात, मागणी-पुरवठा या घटकांभोवती फिरत असते.

सक्रिय असणारे जागतिक राजकारण हे सर्वच देशांवर कमी-अधिक फरकाने प्रभाव पाडत असते. जागतिक राजकारणातील एखाद्या देशाचे स्थान हे त्या देशाचे सामर्थ्य, बलस्थाने व उपद्रवमूल्य निश्चित करू शकते. जागतिक स्तरावर एखाद्या देशाची प्रतिमा व दबदबा कसा आहे यावरून हे स्थान अधोरेखित होते.

प्रस्तुत शोधनिबंध हा भारताचे जागतिक राजकारणातील स्थान अधोरेखित करणारा आहे. कारण जगातील सर्वांत मोठी लोकशाही असणारे व अवाढव्य विविधतेत एकता असणारे हे संघराज्य जागतिक राजकारणात लक्षवेधी व निर्णायक भूमिका पार पाडत आले आहे. उदा : भारत हा युनोचा संस्थाचा सदस्य आहे.

1950 नंतर व यापूर्वीही ब्रिटिश भारतात आपले जागतिक राजकारणातील स्थान हे उल्लेखनीय स्वरूपाचे होते. कारण भारताचा खंडप्राय विस्तार, द्वीपकल्पीय स्थान, विस्तृत भूमी-समुद्रकिनारा, बहुआयामी स्वरूप व संस्कृती-ज्ञानाची परंपरा इत्यादी भारत ही जागतिक पातळीवरील एक समृद्ध व संपन्नता असणारी आदर्शवत अशी भूमी आहे.

भारताने जागतिक स्तरावर शांतता, सुसंवाद व आंतरराष्ट्रीय कायद्याचा पुरस्कार केला आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने बड्या राष्ट्रांच्या गटांत सहभागी न होता स्वतंत्र व निपक्ष भूमिका घेतली. वसाहतवाद-साम्राज्यवादाला विरोध करत शोषित राष्ट्राच्या स्वतंत्रता व सक्षमीकरणाला प्राधान्य दिले. वैश्विक स्तरावरील युद्धजन्य संघर्षात भारताने समन्वय व अहिंसक भूमिका ठामपणे मांडली आहे. भारताचे परराष्ट्र धोरण हे संतुलित व परस्पर सामंजस्य-मैत्रीचे आहे. भारताने आजपर्यंत कोणत्याही देशावर आक्रमण केलेले नाही. हजारो-लाखो निर्वासित, विस्थापित लोकसमूहांना भारताने आसरा दिलेला आहे. शेजारी देशांबरोबरचे सीमाविवाद परस्पर चर्चा व सनदशीर मार्गाने सोडवण्याचे प्रयत्न केले आहेत. भारताच्या शेजारी असणाऱ्या लहान-गरीब राष्ट्रांना सर्वतोपरी मदत करत त्यांच्या उभारणीत योगदान दिले आहे.

पाकिस्तान, मलेशिया व तुर्कस्थान वगळता सर्वच इस्लामिक देशांबरोबर भारताचे मैत्री व विश्वासाचे संबंध आहेत. भारताने अणुऊर्जेचा वापर लष्करी कारणांसाठी न करता नागरी कारणांसाठी केलेला आहे. भारताची जागतिक स्तरावरील प्रतिमा ही महात्मा गांधी, गौतम बुद्ध, पंडित नेहरु, डॉ.द्वारकानाथ कोटनीस, रवींद्रनाथ टागोर,

डॉ.आंबेडकर, डॉ.स्वामीनाथन या कर्तबगार व्यक्तींचा देश अशी आहे. भारताने आंतरराष्ट्रीय न्यायालय, युनो व इतर जागतिक संघटनांच्या निर्णयाचा-धोरणांचा तटस्थपणे अवलंब केला आहे.

**उद्दिष्ट्ये:**

प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

1) जागतिक राजकारण व भारत यांचा अभ्यास करणे.

2) भारताची विश्व स्तरावरील प्रतिमा अभ्यासणे.

3) भारताचे जागतिक राजकारणातील स्थान अधोरेखित करणे.

4) भारताची शक्तीस्थाने बलस्थाने स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी द्वितीयक स्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन :**

भारताचे जागतिक राजकारणातील स्थान, महत्त्व व प्रभाव पुढीलप्रमाणे सोदाहरण स्पष्ट करता येईल.

1) युनोच्या शांतता निर्मिती सेना दलामध्ये भारताचे सर्वाधिक योगदान राहिले आहे. अस्थिरता, अराजकता, यादवी हिंसाचारग्रस्त आशिया-आफ्रिकन देशांमध्ये भारतामध्ये शांतता निर्मिती व पायाभूत सुविधा उभारणीमध्ये मोलाचा हातभार लावला आहे. उदा : अफगाण, सुदान इ.

2) रशिया-युक्रेन, थायलंड-कंबोडिया, इस्रायल-हमास, इराण-इस्रायल, आर्मेनिया-अक्षर वैझान, अमेरिका-इराक, चीन-तैवान या सर्व युद्धजन्य स्थितीत भारताने सर्वमान्य तोडगा व युद्धबंदीचा भक्कम पुरस्कार केला आहे. भारताने जागतिक शांततेला चालना दिली आहे.

3) सर्व प्रकारच्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीमध्ये भारताने वैद्यकीय व अन्नधान्य स्वरुपातील सर्वाधिक मदतकार्य केले आहे. उदा : नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान इ.

4) युनोच्या सुरक्षा समितीच्या स्थायी सदस्यत्वाचा भारत प्रबळ दावेदार आहे. सुरक्षा समितीच्या फेररचनेचा आग्रह करत ती अधिक सर्वसमावेशक होण्यासाठी भारत प्रयत्नशील आहे. 'Global South' चा भक्कत आवाज भारत आहे. विकसित महासत्तांच्या मनमानी धोरणांना उघड विरोध करण्याचे धाडस भारतामध्ये आहे.

5) गरीब, अविकसित व मागास राष्ट्रांच्या हक्कांचे व सार्वभौमत्त्वाचे संरक्षण करण्यासाठी भारत कटिबद्ध आहे. उदा : तिबेट, भूतान, तैवान, मालदीव इ. भारताने 'शेजारी प्रथम' या धोरणानुसार शेजारील राष्ट्रांना शक्य ती सर्व प्रकारची मदत केली आहे. राष्ट्र उभारणीत योगदान दिले आहे. पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत.

6) जागतिक पातळीवर मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी भारताने सातत्याने कृतिशील भूमिका घेतली आहे. वांशिक संघर्षात भारताने मानवतावादी भूमिकेतून सर्व प्रकारचे मदत कार्य केले आहे. उदा : श्रीलंका, रवांडा, घाना इ. 2 ऑक्टोबर हा दिवस (महात्मा गांधी जन्मदिन) जगभरात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' तर 21 जून हा 'जागतिक योग दिन' म्हणून साजरा केला जातो. डॉ.कलाम यांचा जन्मदिन 'आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो. ही दिनविशेष प्रथा भारताचे जागतिक स्थान अधोरेखित करणारी आहे.

7) भारतामध्ये UNESCO ची जागतिक वारसास्थळे आहेत. उदा : ताजमहल, पश्चिम घाट, कुंभमेळा, दुर्गापूजा, लेणी, स्मारके, किल्ले, जलाशय, सरोवर इत्यादी रामसर करारातील सर्वाधिक पाणथळ/आर्द्र जलाशये व

भूमी भारतात आहेत. भारताने जगाला योग, संगीत, आयुर्वेद दिले आहे. BRICS, SAARC, IBSA, G-20, BIMSTEC, ISA या विश्वस्तरावरील संघटनांचा भारत संस्थापक सदस्य आहे.

8) कबड्डी, क्रिकेट, कुस्ती, नेमबाजी, मल्लखांब, तिरंदाजी, टेनिस, बुद्धीबळ, भालाफेक, जलतरण, धावणे या सर्व क्रीडा प्रकारांत भारत अग्रेसर आहे. ही भारताची सॉफ्ट पॉवर आहे. राष्ट्रकूल, आशियाई, दक्षिण आशियाई स्पर्धामध्ये भारत क्रमवारीत प्रथम असतो.

9) अल्पसंख्यांक, आदिवासी, निर्वासित, विस्थापित, शोषित-पीडित समुदायांच्या हक्कांचे संरक्षण करण्यामध्ये भारत नेहमीच पुढाकार घेतो आहे. उदा : रोहिंग्या समुदाय. जवळपास 12 भारतीयांना नोबेल तर 8 भारतीयांना बुकर हे जागतिक सन्मान प्राप्त झाले आहेत. डॉ.कलाम, डॉ.कुरियन, डॉ.स्वामीनाथन, डॉ.कोटनीस, डॉ.अमर्त्य सेन, संदीप वासलेकर, अजित डोवाल, रतन टाटा, पं.रविशंकर, उस्ताद झाकिर हुसेन, जे.पी. नाईक, डॉ.होमी भाभा, डॉ.विक्रम साराभाई या सर्व महनीय व कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी भारताची प्रतिमा जागतिक स्तरावर उंचावली.

10) चंद्राच्या दक्षिण ध्रुवार पाय ठेवणारा भारत हा पहिला देश आहे. इस्त्रो (ISRO) च्या यश व कर्तृत्वाचा लौकिक संपूर्ण जगभरात पोहचला आहे. यु.एस.ए. सारखा देश आज NATO+, क्वाडमध्ये भारताला मानाचे स्थान देत आहे. हिंद-प्रशांत महासागरातील भारत ही सर्वांत प्रभावी शक्ती मानली जाते. जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आपली असून लष्कर, वायु दल, नौदल यामध्ये अधिक भक्कम आहे.

11) महासत्ता व बड्या राष्ट्रांच्या मनमानी धोरणांना विरोध करण्याचे सामर्थ्य भारतात आहे. तैवान, गाझापट्टी, तिबेट, द.कोरिया, मेक्सिको इ. भारत 'वसुधैव कुटुंबकम' चा पुरस्कार करत आला आहे. ज्यामध्ये विश्वकल्याणाची भूमिका आहे. शीतयुद्ध असो वा शीतयुद्धोतत्र काळ भारत कोणत्याही लष्करी गटात सामील झाला नाही. उदा : CEATO, CENTO, वार्सा इ.

12) भारतीय संस्कृतीतील तत्त्वे, जीवनमूल्ये, उदात्त व आदर्शवत अशा प्रथा-परंपरा, सण-उत्सव ही सर्व भारताची सुप्त क्षमता आहे. ज्यामुळे भारत विश्वस्तरावर वेगळेपण व अनुकरणीय स्थान दर्शवतो. भारतीय शेती, ग्रामीण जीवन व सण-उत्सव हे सर्व निसर्गपूजक असल्याने जगभरातील अभ्यासक याचा जिज्ञासेने अभ्यास करतात.

**निष्कर्ष :**

1) स्वातंत्र्योत्तर भारतीय लोकशाहीची प्रजासत्ताकाची वाटचाल व प्रगती बघता अजूनही काही जुनाट समस्य व अडथळे असल्याने भारताची विश्वप्रतिमा घसरते. उदा : भ्रष्टाचार, जातीयवाद, भाषावाद इ.
2) ऑलिंम्पिक स्पर्धांमध्ये भारत अजूनही खूप मागे असून जागतिक क्रमवारी सुधारायला हवी. ऑलिंम्पिक ही सर्वोच्च गुणवत्ता मानली जाते. सुवर्णपदकांचा दुष्काळ संपावा.
3) जागतिक स्तरावरील अनेक निर्देशांकामध्ये भारताचे स्थान निचांकी दिसते. उदा : HDI, भूकबळी, प्रदूषण, शांतता, भ्रष्टाचार, लिंग समानता, वृत्तपत्र स्वातंत्र्य, मानवी हक्क या सर्व जागतिक निर्देशांकामध्ये भारताचे स्थान पहिल्या 100 मध्ये नसते; ही क्रमवारी सुधारायला हवी. हे निचांची स्थान भारताचे विश्वप्रतिमा डागाळते आहे.
4) भारत भूमीवरील सर्व प्रकारचा दहशतवाद बिमोड करायला हवा. फुटीर व बंडखोर प्रवृत्तीवर नियंत्रण हवे. आज प्रत्येक देश दहशतवादाचा सामना करत आहे. हिंसा, दहशत, हत्या, दंगली, छुपे हल्ले, अफवा, भीती यामुळे

एखाद्या देशाची वैश्विक प्रतिमा मलिन होते. शांतता-सुव्यवस्था व प्रगती ठप्प होते.

5) भारतीय संस्कृती, पर्यावरण, वारसा, ऐतिहासिक स्थळे, इतिहास, जैवविविधता, उत्सव, ग्रंथ, स्थापत्यकला, शिल्पे, प्राचीन मंदिरे ही सर्व भारताची अद्वितीय संपत्ती आहे. याचे संवर्धन, जतन व संरक्षण व्हायलाच हवे.

**शिफारशी:**

1) जगातील सर्वांत मोठी भारतीय लोकशाही अधिक परिपक्व होण्यासाठी मतदानाचे वय 21 इतके हवे.

2) सुरक्षा समिती स्थायी सदस्यत्व भारताला मिळायला हवे.

3) यु.एस.ने. भारतीय आयातीवर लादलेले अन्यायी वाढीव आयात शुल्क रद्द व्हायला हवे.

4) काश्मीर प्रश्नावर ठोस व कायमस्वरुपी तोडगा/उपाय अत्यावश्यक आहे.

5) उपद्रवी व विघातक शेजारी देशांकडून भारतामध्ये होणारी घुसखोरी, तस्करी, गुन्हे, अवैध व्यापार यावर कठोर निर्बंध आणायला हवेत.

6) काही आंतरराष्ट्रीय NGO भारताची हेतूपूर्वक बदनामी करत प्रतिमा मलीन करतात यांचे अहवाल बंदी यावी.

**संदर्भ**

1) जागतिक राजकारण, अंजली रानडे, डायमंड प्रकाशन

2) असा घडला भारत, रोहन प्रकाशन

3) आंतरराष्ट्रीय राजकारण, बी.डी. तोडकर, प्रशांत प्रकाशन